मेरी क्यूरी

इबी लेप्स्की



चित्र : पाओलो कार्डोनी, मराठी : अश्विनी बर्वे



मेरी खूप लाजाळू, संवेदनशील आणि भावुक होती. ती प्रत्येक गोष्ट गंभीरतेने घेत असे आणि त्यात दुसऱ्यांना न्याय मिळवून देण्याची इच्छा असे.




जर तिला काही अनुचित वाटलं तर ती अचानक रडू लागे.

ती पाची मुलांमध्ये सगळ्यात लहान होती.

आईने आपल्या प्रत्येक मुलाला एक छोटंसं, गोड नाव दिलं होतं. मेरी, सगळ्यात छोटी होती तिची इतर मुलांच्या तुलनेत अधिक नावं होती "मान्या, मानुसिया, मानुसिना, एनसुपेयो.

शेवटचं नाव मजेशीर होतं, ते आईनं ठेवलेलं पहिलं नाव होतं, जेव्हा मेरी पाळण्यातच होती.




वेळ घालवण्यासाठी तिला पुस्तकं वाचायला आवडत.

जेव्हा ती बोलू आणि चालू पण शकत नव्हती, तेव्हा मेरी सतरंजीवर बसून एकानंतर एक पुस्तकांची पाने उलटत असे.

"ही एक अजब गोष्ट आहे," आईने एक दिवस आपल्या पतीला सांगितलं. "मी आपल्या मानुसियाला खूप लक्षपूर्वक पुस्तकांची पानं उलटतांना पाहिलं आहे. एवढंच नाही तर ती बिना चित्रांच्या पुस्तकाची पानं सुद्धा उलटते."

मग आईने विचार केला, "कदाचित तिला पानं उलटण्याचा आवाज आवडत असेल."






मेरी आणि तिचं कुटुंब पोलंडची राजधानी वारसा मध्ये राहत होते.

रोज सकाळी जेव्हा तिचे भाऊ आणि बहिणी शाळेत जात तेव्हा मेरी एका हरवलेल्या मुलासारखी सगळ्या घरात फिरत असे, आणि मग बैठकीच्या खोलीत जात असे.

तिला बैठकीची खोली एक आकर्षक आणि छान जागा वाटत असे.

तिला बैठकीच्या खोलीतल्या सगळ्या गोष्टी आवडत असत. पुस्तकांनी भरलेली मांडणी, आणि महोगनी लाकडापासून बनवलेलं डेस्क ज्याला द् खूप ड्रॉवर होते.

लाल मखमली सोफा, निळ्या भुऱ्या रंगाचे घड्याळ, फ्रान्सहुं आणलेले किंमती कप आणि प्लेट्स ज्यांना कधी हात लावण्याची परवानगी नव्हती.एक चार पायांचा संगमरमरचे टेबल, आणि एक बॅरोमीटर जे वडील एका खास दिवशी काळजीपूर्वक स्वच्छ करून सेट करत असत.



पण तिला वरचा काचेचा कप्पा खूप आवडत असे कारण त्यात कितीतरी छोट्या, रहस्यमी वस्तू ठेवलेल्या होत्या. त्यात छोट्या काचेच्या नळ्या, छोटा तराजू, अजब आणि जटिल उपकरणं होती. ज्यांना समजून घेणं अवघड होते. तिथं काही अजब आणि रंगीत दगडांचा संग्रह होता.

काही दगडांवर निळ्या रेघा होत्या.इतरांमध्ये छोट्या गाठी होत्या, आणि ते निश्चित चांदीच्या होत्या. काही दगड पारदर्शक होते,जे बर्फाच्या तुकड्यां सारखे दिसत होते, काही पिवळे होते.पण मेरीला सुंदर गुलाबी रंगाचा दगड आवडायचा.

मेरी त्या गंमतीशीर वस्तूंचे निरीक्षण करून थकत नसे. रोज ती त्यात नवीन काहीतरी शोधत असे, जे तिने आधी बघितलेले नसे. तिला ते बघायला खूप मजा येई.



एक दिवस वडिलांनी मेरीला त्या जादुई कपाटासमोर उभं असलेलं पाहिलं.

“मी बघतो आहे की तू माझे भौतिकी उपकरणं न्याहाळते आहे मानुसिया,“ त्यांनी हसत म्हटले.

भौतिकी उपकरण! अच्छा! तर या विचित्र वस्तूंच्या संग्रहाचे नाव हे आहे तर!

वडिलांनी कपात उघ्द्ल्म आणि मेरीला सगळ्या गोष्टींना हात लावण्याची परवानगी दिली.

त्यांनी मेरीला समजावलं की ते दगड खनिजांचे नमुने होते आणि तो अद्भुत गुलाबी रंगाचा दगड क्वार्ट्ज होता, आणि ती रहस्यमय वस्तू इलेक्ट्रोस्कोप होती .



दुसऱ्या दिवशी आईला मेरीच्या जिभेवर एक छोटा हिरव्या रंगाचा डाग दिसला.

तो कशाचा असेल? एखादा आजार? आधी तर आई घाबरून गेली.पण रहस्य लवकरच समोर आले..

मेरीने रडत सांगितले की तिने आपल्या जिभेच्या टोकाने हिरवी शाई चाखण्याचा प्रयत्न केला.

आई तिच्यावर जोरात ओरडली आणि मग तिने तिला एक ग्लास दूध प्यायला दिले.



नंतर, वडिलांनी मेरीकडे हिरव्या शाईची चौकशी केली. त्यांनी विचारले की, तिने असा वेडेपणा का केला? मेरीने उत्तर दिले की हिरव्या वस्तूच्या बाबत खूप काही माहित होते. तिने हिरव्या शाईचे "परीक्षण" करण्यासाठी चाखले होते. काही वस्तूंचा रंग हिरवा होता - आंबा, पालक, मटार इत्यादी. पण तिला माहीत करून घ्यायचे होते की सगळ्या हिरव्या वस्तूंचा स्वाद सारखाच आहे का?.

तिचे वडील म्हणाले, "व्वा!व्वा!" मग आईकडे वळून म्हणाले: "असं वाटतं की आज आपल्या मानुसियाने एक छोटा वैज्ञानिक प्रयोग केला आहे."



प्रत्येक संध्याकाळी, अंथरूणावर झोपण्यापूर्वी थोड्यावेळ सगळी मुलं आणि आईवडील बैठकीच्या खोलीत एकत्र येत.

तेव्हा ते सचित्र पुस्तकं वाचत किंवा मग शांततेने एखादा खेळ खेळत असत. वडील सुद्धा पुस्तक वाचत किंवा आईशी गप्पा मारत.

आईसुद्धा वाचत असे किंवा पियानो वाजवत असे. पण नेहमी ती मुलांसाठी चप्पला तयार करत असे. मेरी साठी कोणतेही काम अयोग्य नव्हते. आणि ती चामडं कापण्यासाठी चांभाराची रापी आणि शिवण्यासाठी सुईचा उपयोग कसा करायचा हे तिला चांगलं माहित होतं.

जेव्हा आई हातोडीने छोटे-छोटे सोनेरी तुकडे बुटांच्या तळव्यांना ठोकत असे तेव्हा मुलं तो आवाज ऐकत. त्या ठाक-ठोकीच्या आवाजात एक संदेश लपलेला होता..

एका संध्याकाळी,मोठ्या सुट्टीच्या शेवटच्या दिवशी, वडिलांनी मुलांना सचित्र पुस्तक वाचण्यास आणि खेळण्यास मनाई केली. त्या संध्याकाळी मुलांना शाळेची पुस्तके वाचली, खासकरून ब्रोन्या जी वाचण्यात खूप कमज़ोर होती.



वडिलांनी जुन्या खोक्यापासून वर्णमालेचे मोठमोठे अक्षरं कापली. पण तरीही ब्रोन्याची काहीच प्रगती होत नव्हती.

ब्रोन्याने एक पुस्तक उघडलं आणि ते आपल्या गुडघ्यांवर ठेवून ती गालिच्यावर बसली. तिने जोरात वाचायला सुरुवात केली. ती वाचतांना अडखळत होती आणि प्रत्येक शब्दावर थांबून थांबून अक्षरं जुळवत वाचत होती.

मग अचानक ब्रोन्याजवळ मेरी बसली आणि तिने अधिरतेने तिच्या हातातले पुस्तक खेचले आणि तिने पूर्ण पान वाचून टाकले. मग तिने पुढे वाचण्यासाठी पान उलटलं.

त्यावेळी मेरीला खोलीत पूर्ण शांतता आहे असं जाणवलं. तिला वाटलं की तिच्याकडे सगळ्यांच्या नजरा आहेत.




“माझं चुकलं, मला माफ करा!” ती ओरडली. “मी हे जाणूनबुजून केलं नाही!” मग ती अचानक रडू लागली.

“मी नेहमी ब्रोन्याची वर्णमाला खोक्यात भरायला मदत करत असे,” ती रडत म्हणाली, आणि तेव्हाच मी वाचायला शिकले. वाचणं खूप सोप्पं आहे!मला माफ करा!”


वडिलांनी आणि आईने तिला खुश करण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की तिने काही चुकीचे केलेले नाही, पण आईवडील दोघांचे एकमत होते की मेरी वाचण्यासाठी अजून लहान आहे, ती फक्त चार वर्षाची होती, जास्त वाचल्याने तिचा मेंदू थकून जाईल.

त्यांना एक विलक्षण बुद्धीचे मुल नको होते.




त्या क्षणापासून आईवडीलानी मेरीच्या वाचण्यावर बंदी आणण्यासाठी तिच्यावर नजर ठेवणं सुरु केलं. त्यांनी भाऊ बहिणींना असं करायला सांगितलं. मेरीने वाचण्यापेक्षा खेळणे महत्वाचे होते.

नेहमीच सगळ्या घरात आवाज घुमत असे: “बघा मेरी वाचत आहे!” मग मेरीच्या हातातून पुस्तक ओढून घेतले जाई आणि तिला खेळण्यासाठी बागेत नेले जाई.



पण तेव्हापासून मेरीच्या आईवडिलांना एका छोट्या मुलीचा सतत आवाज येई जो विचारे; “आता मी वाचू शकते का?कृपया,मी आता वाचू शकते का?”


शेवटी वडिल या नित्कर्षाला आले की मेरीसाठी लहान वयातच शाळेत जाणं सगळ्यात योग्य होईल.तिच्या बुद्धीला व्यायामाची गरज आहे.




तसं तर ती शाळेत सगळ्यात छोटी होती, पण निःसंदेह सगळ्यात चतुर होती.

त्या काळात रुसने मेरीच्या पोलंड देशावर आक्रमण केलं होतं. रशियाने पोलंड जिंकल्यावर पोलंडच्या शाळेत रशियन इतिहास आणि रशियन भाषा शिकवण्याची सक्ती केली.

नेहमी एक खूप मतलबी इंस्पेक्टर शाळेत येत असे. शाळेत इन्स्पेक्टर आल्याची सूचना घंटा वाजवून दिली जाई. इन्स्पेक्टर शाळेत रशियन इतिहासाचा अभ्यास निश्चित करण्यासाठी येई.



पण शिक्षक गुपचुपपणे मुलांना त्यांच्या देशाचा पोलंडचा दुर्भाग्यपूर्ण इतिहास पण शिकवत असत. यामुळे मुलं भ्रमित होत असत. ते इतिहासातल्या महत्वाच्या तारख्या आणि नावं विसरून जात.




पण जेव्हा घंटा वाजवून इन्स्पेक्टर येण्याची सूचना मिळाली तेव्हा मेरीने कोणत्याही चुकीशिवाय आणि संकोचाशिवाय प्रसिद्ध रशियन नावं आणि महत्वाच्या तिथी सांगून सगळ्यांना वाचवलं.

त्यामुळे संतुष्ट होऊन इन्स्पेक्टर गेले. पण नंतर छोटी मेरी संवेदनशील आणि भावूक होऊन रडू लागली.

जसजसा काळ गेला, मेरीला प्रत्येक छोट्या गोष्टीसाठी रडणे योग्य वाटलं नाही. पण तिचं विज्ञान शिकण्याचे प्रेम कधीच बदलले नाही.

एका स्वप्नासारखे तिच्या वडिलांचे अद्भुत भौतिक उपकरण नेहमी तिच्या डोक्यात फिरत असत.



मग मेरीने भौतिकशास्त्राचा अभ्यास केला आणि ती एक महान वैज्ञानिक झाली. आपले पती, पियरे क्यूरीच्या बरोबर तिने एक नवीन तत्व शोधले - रेडियम - जे सतत किरणं, उष्णता आणि एक रहस्यमय निळा प्रकाश उत्सर्जित करत असे. तो विसाव्या शतकातला महान वैज्ञानिक शोधांपैकी एक आहे.

समाप्त